नि.फौ.ख.क्र. २६५/२०२२
निशाणी क्र. २०

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. १ यांचा सरतपास शपथेवर.**

**नाव:** प्रशांत धनाजी आष्टेकर,

**वय:** ४१ वर्षे, **व्यवसाय:** सिव्हील कॉन्ट्रॅक्टर,
**पत्ता:** आरचिड सिटी, भिगवण रोड, बारामती,

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती जी. एस. अहिवळे यांचे मार्फत.**

माझा सन २०१० पासून सिव्हील कॉन्ट्रॅक्टर म्हणून घराचे बांधकाम करणे, प्लॅन तयार करणे असा व्यवसाय सन २०१४ अखेर सुरूळीत चालू होता. मी जॉईंट व्हेंचरचे प्रोजेक्ट करायचो. सन २०१५ मध्ये दुष्काळ तसेच नोटबंदी मुळे रियल इस्टेट व्यवसायावर मंदी आली. माझे काही प्रोजेक्ट चालू होते, काही अर्धे झाले होते, काहींचा ताबा देणे बाकी होते तर काही फ्लॅट बुकींग झालेले होते. माझी खाजगी कामे पुर्णपणे बंद झालेली होती. त्यामुळे माझ्यावर आर्थिक संकट आले होते. मी बॅकोचे कर्ज घेऊन झालेले होते तसेच ओळखीच्या लोकांकडून, मित्रांकडून ऊसने पैसे घेतलेले होते तरी देखील मला लोकांना फ्लॅटचा ताबा देणे असल्याने आणखी पैशाची गरज होती.

२. मी सोमनाथ नलवडे यांना ओळखतो. त्यांचा सावकारकीचा व्यवसाय असल्याचे मला ओळखीतून समजले. त्यानंतर मी त्यांचेकडे पाच लाख रूपये मागितले. त्यांनी मला पाच लाख रूपयाचे बदल्यात काही तरी तारण देणेचे सांगितले. त्यामुळे मी माझे वडिलांचे नावे असलेली पळसमंडळ येथील जमिन गट नं. ४८/१/अ क्षेत्र ३० गुंठे तारण देणेचे ठरविले. त्यावेळी सोमनाथ नलवडे यांनी १ एकर क्षेत्र असते तर पाच लाख दिले असते परंतु १ एकर पेक्षा क्षेत्र कमी असल्याने साडे चार लाख देतो असे सांगितले. तसेच त्याचे खरेदीखत करून दयावे लागेल अशी अट घातली. त्यानंतर दिनांक ०१/०३/२०१६ रोजी आम्ही पळसमंडळ येथील जमिन गट नं. ४८/१/अ चे खरेदीखत सोमनाथ जयसिंग सपकळ यांचे नावे करून दिले. सोमनाथ नलवडे यांनी असे सांगितले की, सोमनाथ सपकळ हे त्यांचे सख्खे

मेव्हणे असून आम्ही दोघे ही सोबतच सावकारकीचा व्यवसाय करतो. त्यामुळे त्यांचे नावे खरेदीखत केले. सदर कर्जाचे व्याजावर दरमहा पाच टक्के असा व्याजदर ठरलेला होता. त्याप्रमाणे माझेत आणि आरोपी क्र. १ व २ यांचेमध्ये असा करारनामा झाला होता की, वर्षभरात मी आरोपी यांचेकडून घेतलेली कर्जाची रक्कम व्याजासहित परत केल्यानंतर त्यांना करून दिलेले खरेदीखत हे ते उलटून देणार होते. सदरचा करारनामा दिनांक २०/१०/२०१६ रोजी १००/— रूपये च्या स्टॅम्पवर करणेत आलेला होता. आता मला सदरचा करारनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार विनोद जाधव, माझे वडील धनाजी आष्टेकर, आणि आरोपींच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (आरोपीच्या वकीलांनी सदरचे कागदपत्र हे या न्यायालयीन अधिकार क्षेत्रात नसल्याने त्यास निशाणी क्रमांक देऊ नये असा आक्षेप घेतला. परंतु कोणत्याही कागदपत्रास ते कागदपत्र न्यायालयीन अधिकार क्षेत्रात येत नसल्याने त्यास निशाणी देता येणार नाही अशा प्रकारची कायदेशीर तरतुद नाही. त्यामुळे सदरचा आक्षेप फेटाळणेत आला.) सदर कागदपत्रास **निशाणी क्र. २१** देण्यात येते.

**३.** करारनामा झाल्याप्रमाणे आरोपींनी मला असे सांगितले होते की, दरमहा व्याजाची रक्कम आणून दयायची. परंतु आर्थिक अडचणीमुळे मी दरमहा व्याजाची रक्कम देऊ शकलो नाही परंतु जशी जमेल तशी वेळोवेळी त्यांना कार्यालयात बोलवून एकूण पाच लाख रूपये दिलेले आहेत. आरोपींनी माझ्याकडे असा तगादा लावला की, माझी रक्कम परत दया आणि व्यवहार पूर्ण करा. जुन २०१८ मध्ये मी व आरोपी एकत्र बसलो असता त्यांनी मला एकूण १३,६५,०००/— रक्कम येणे असल्याचे सांगितले. मी त्यांना पाच लाख रूपये दिलेले असून देखील त्यांनी असलेल्या व्याजावर आणखी व्याज लावून मला जास्तीची येणे रक्कम सांगितली. तसेच सदरची रक्कम लवकरात लवकर देणेकामी दबाव आणला.

४. दरम्यानच्या काळात माझे विष्णू मारूती जाधव यांचेसोबत जॉईन्ट व्हेंचरमध्ये काम चालू होते. त्यामध्ये माझ्याकडे तिसऱ्या मजल्यावरील एक फ्लॅट होता. मी आरोपींना सांगितले की, सदरचा फ्लॅट विक्री झाल्यानंतर मी तुम्हाला तुमची रक्कम परत करतो. परंतु सदरचा फ्लॅट विक्री होत नाही. त्यावेळेस आरोपींनी सदरचा फ्लॅट आम्ही खरेदी घेतो त्याची काय रक्कम आहे असे विचारले. त्याप्रमाणे आम्ही बैठकीस बसलो. मी सदर फ्लॅटची किंमत २५,००,०००/— रूपये असल्याचे सांगितले. सदरचा व्यवहार हा २१,००,०००/— रूपयेमध्ये ठरविण्यात आला. रक्कम रूपये २१,००,०००/— मधून १३,६५,०००/— वजा करून उर्वरित रक्कम ७,३५,०००/— खरेदीवेळी देण्याचे आमच्यामध्ये ठरले. दिनांक १९/०७/२०१८ रोजी खरेदीचा दिवस ठरला. खरेदी करतेवेळेस असे ठरले की, ज्या दिवशी सदरचा फ्लॅट आरोपींच्या नावे होईल त्या दिवशी आरोपींनी पळसमंडळ येथील जमिन माझ्या नावे करण्याचे ठरले.

५. आमच्यामध्ये ठरल्याप्रमाणे सोमनाथ सपकळ हे पळसमंडळ येथील जमिन खरेदी देणेकरिता माळशिरसला रजिस्टर ऑफिसला तर फ्लॅट चे खरेदीखत हे सोमनाथ सपकळ यांचे पत्नीचे नावे करणेचे असल्याने त्यांची पत्नी फ्लॅटचे खरेदीखत करणेकरिता इंदापूर येथे येणार होते. त्याप्रमाणे सोमनाथ सपकळ यांची पत्नी इंदापूरमध्ये आल्या व विष्णू जाधव यांनी त्यांना ठरल्याप्रमाणे कोणताही मोबदला न घेता त्यांचे नावे साठेखत करून दिले. मी माळशिरस येथे थांबलो होतो परंतु सोमनाथ सपकळ हे आले नव्हते. आमचे फोन चालू होते त्यांनी असे सांगितले की, ते सकाळी पुणे येथून निघाले आहेत तसेच ते जेवायला थांबले आहेत, गाडी फलटण येथे पंक्चर झाली आहे अशी कारणे सांगून २:०० ते २:३० वाजेपर्यंतचा वेळ होऊन देखील ते आले नाहीत. त्याच दरम्यान माझे सोमनाथ नलवडे यांचेसोबत फोन चालू होते. त्यांनी सोमनाथ सपकळ व्यवहाराकामी येणेची हमी दिली. साधारण १:३० ते २:०० वाजताचे दरम्यान

**नि.फौ.ख.क्र. २६५/२०२२**
**निशाणी क्र. २०**

फ्लॅटचे साठेखत सोमनाथ सपकळ यांचे पत्नीचे नावे झाले नंतर सोमनाथ सपकळ व सोमनाथ नलवडे यांचे फोन बंद असल्याचे येऊ लागले. मी सायकाळी ५:३० वाजेपर्यंत माळसिरस येथे थांबलो होतो परंतु त्यांचे फोन लागले नाहीत. त्यानंतर मी या व्यवहारासाठी मध्यस्थी व साक्षीदार असलेले विनोद विष्णू जाधव आणि अशोक विष्णू जाधव यांना फोन केला. सदर मध्यस्थी व साक्षीदार यांनी देखील आरोपींना फोन केला असता त्यांचा फोन बंद लागला. त्यावेळी साक्षीदार यांनी आरोपींना भेटू असे सांगितले त्याप्रमाणे आम्ही दुसऱ्या दिवशी वालचंदनगर येथे आरोपींना भेटलो. आम्ही आरोपींना भेटलो असता त्यांनी असे सांगितिले की, त्यांची बहिण व दाजी यांनी सदरचा फ्लॅट अपूर्ण असल्याने कसा घ्यायचा, ते फ्लॅटचे काम पूर्ण करतील कशावरून, त्यामुळे आपल्याला हा फ्लॉट नको. त्यावेळी मी त्यांना असे म्हणालो की, मग हा व्याप कशाला करायचा तुम्हाला आधीच माहिती होते की, सदरच्या फ्लॅटचे काम ९० टक्के पूर्ण झालेले आहे. त्यावेळी आरोपी असे म्हणाले की, तुम्ही फ्लॅटचे काम पूर्ण करून दया. ज्या दिवशी फ्लॅटचे काम पूर्ण होईल त्या दिवशी खरेदीखत पलटून देतो तसेच उर्वरित रक्कम देखील देतो. सदर अपार्टमेंटमधील काम पूर्ण होणेकरिता १७ ते १८ महिने लागले. काम पूर्ण झालेनंतर आम्ही आरोपींना संपर्क करणेस सुरूवात केली. परंतु त्यांना सुट्टी नाही, वेळ नाही अशी कारणे देऊन त्यांनी टाळाटाळ सुरू केली. त्यानंतर नलवडे यांनी दिनांक २१/०३/२०२१ रोजी सकाळी ९:३० वाजताच्या दरम्यान फोन करून सांगितले की, तुला काय कराचे ते कर आम्ही तुला खरेदीखत पलटून देणार नाही तसेच पैसे परत देणार नाही. तसेच मला शिवीगाळ आणि धमकी दिली. त्यानंतर देखील मी त्यांना संपर्क करणेचा प्रयत्न केला परंतु त्यांनी फोन उचलला नाही. त्यानंतर मी सोमनाथ सपकळ जे पुण्यात राहतात त्यांना देखील भेटणेकरिता दोन वेळेस गेलो होतो परंतु ते मला दोन्ही वेळेस भेटले नाहीत. दुसऱ्या वेळेस दिनांक ०१/०४/२०२१ रोजी मी सपकळ यांना भेटलो नाही त्यामुळे घरी जात होतो त्यावेळेस मला त्यांचा फोन

आला की, पुन्हा माझ्या दारात यायचे नाही. तसेच शिवीगाळ व धमकी दिली. (आरोपींच्या वकीलांनी असे निदर्शनास आणले की, साक्षीदार हा त्याच्याकडील असलेल्या कागदावरून साक्ष देत आहेत. साक्षीदार यांचेसमोर असलेला प्लॅस्टीक फोल्डरमध्ये एफ.आय.आरची कॉपी असल्याचे दिसून आले. परंतु सदर साक्षीदार यांचे हातामध्ये सदर फोल्डर नव्हता तर सरदचा फोल्डर हा विटनेस बॉक्सच्या कठडयावर होता. याची न्यायालयामार्फत नोंद घेण्यात येते.) त्यानंतर मला अशी जाणीव झाली की, या आरोपींनी माझी फसवणूक करणेचे ठरविले आहे. त्यानंतर मी सन २०२० मध्ये पोलीसांकडे गेलो. त्यावेळेस कोरोनाचा काळ चालू होता. त्यामुळे पोलीसांनी मला पोलीस हे सध्या केवळ गंभीर स्वरूपाच्या बाबीकडे लक्ष देत आहेत त्यामुळे मी कोरोना संपल्यावर या असे मला सांगितले. त्यानंतर मी दिनांक १९/१०/२०२१ रोजी एस. पी. ऑफिस पुणे येथे माझी लेखी तक्रार नोंदविली.

(सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून पुढील सरतपास तहकूब करणेत येतो.)

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

JYOTI NITIN BHASME
Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2024.07.29 17:28:07 +0530

ठिकाण इंदापूर (जे. एन. भस्मे)
दिनांक २९/०७/२०२४ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.